राज्य माहिती आयोगातील कागदपत्रं
जतन करुन ठेवण्याबाबत


**राज्य माहिती आयोग, मुख्यालय**
१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
website : sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९९८४ | फॅक्स क्र.०२२-२२०४९३९०


क्र. मुमाआ-२०२२/प्र.क्र. २५/०१. | दिनांक: १६.०६.२०२२.

**पहा :-** आयोगाची क्रमांक मुमाआ २००८/प्र.क्र.११९/०१ दिनांक १९.०६.२०१३ व दिनांक ११.०८.२०१४ रोजीची परिपत्रके.

**-: परिपत्रक :-**

राज्य माहिती आयोगाकडे येणारी अपीले, तक्रारी व त्यानुषंगान निर्माण झालेल्या नस्त्या किंवा कागदपत्रे ही किती कालावधीसाठी जतन करण्यात यावीत याबाबतचा निर्णय संदर्भाधीन परिपत्रकान्वये घेण्यात आला होता.

राज्य मुख्य माहिती आयुक्त यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५, मधील कलम १५(४) प्रमाणे प्रदान केलेल्या अधिकारानुसार मुख्यालयातील व इतर आयोगातील असलेले अभिलेख जतन करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. अपील व तक्रारी यांची सुनावणी होऊन आदेश पारित झालेल्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीनंतर ज्या अपील व तक्रारींबाबतीत कोर्ट केसेस नाहीत अशा नस्त्या नष्ट करण्यात याव्यात. मात्र सदरील नस्त्या नष्ट करीत असताना मूळ माहिती अर्ज व त्यावरील द्वितीय अपीलाच्या आदेशाची प्रत कायमस्वरुपी रेकॉर्ड म्हणून जतन करावे.
२. जी प्रशासकीय /संकीर्ण स्वरुपाची कागदपत्रे आहेत त्याबाबत राज्य शासनामधील प्रचलित पद्धतीनुसार त्या त्या कालावधीसाठी जतन करावे.
३. ज्या प्रकरणी शास्ती लावण्यात आली आहे अशी प्रकरणे "क" वर्ग जतन करावीत.

मुख्यालयातील सचिव व इतर आयोगातील उपसचिवांनी त्यांच्या अखत्यारितील अभिलेख वरीलप्रमाणे तपासून नष्ट करावयाचा अभिलेख नष्ट करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

(सविता जावळे)
सचिव, राज्य मुख्य माहिती आयोग,मुंबई

**प्रत :**

उप सचिव, राज्य माहिती आयोग, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, पुणे, बृहन्मुंबई, कोकण, अमरावती.